सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

## दरपत्रक सूचना क्रमांक: ०५/२०२२

क्रमांक : एसटीएन-०१२०/सीआर-०२/२०२२/चार — दिनांक : १३ मे, २०२२

**विषय : आयोगाच्या महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, कुपरेज येथील कार्यालयात पिण्याचे पाणी, चहापान, अल्पोपहार व भोजन पुरविण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, कुपरेज कार्यालयात पिण्याचे पाणी, चहापान, अल्पोपहार व भोजन इत्यादी पुरविण्याकरीता पात्र संस्थेकडुन संस्थेच्या लेटर हेडवर विहित नमुन्यात (परिशिष्ट-१) सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | | दर |
|---|---|---|---|
| १ | अ | पाणी बॉटल (५०० ML व १००० ML) | |
| | ब | चहा/कॉफी | |
| | क | अल्पोपहार (पोहा, उपमा, शिरा, मिसळ, साबुदाणा खिचडी, ईडली ,डोसा इ.) | |
| | ड | जेवण थाळी (शाकाहारी/मासांहारी) | |
| २ | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : २५ मे, २०२२ दुपारी ३.०० वा. | |
| ३ | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड इमारत, ८ वा मजला, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज मुंबई ४०० ०२१. | |

**२.** दरपत्रक पाठविताना तांत्रिक दरपत्रक व आर्थिक दरपत्रक **वेगवेगळया** लिफाफ्यामध्ये पाठविण्यात यावे.

**(१) लिफाफा क्रमांक-१ तांत्रिक दरपत्रक यामध्ये खालील कागदपत्रे सादर करण्यात यावीत.**

(I) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम , १९४८ नुसार दुकानाची मुंबई येथील नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत.

(II) अन्न व औषध विभागाच्या परवान्याची प्रत.

(III) GST ARN Number प्रमाणपत्र.

(IV) पॅन कार्ड

(V) दरपत्रकासोबत इसारा ठेव (EMD) रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) डिमांडड्राफ्टद्वारे Maharashtra Public Service Commission या नावाने सादर करणे अनिवार्य आहे.

(VI) खरेदी प्राधिका-यांबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल दरपत्रक सादर केल्याबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर).

**(२) लिफाफा क्रमांक-२ आर्थिक दरपत्रक यामध्ये संस्थेच्या लेटर हेडवर विहित नमुन्यात (परिशिष्ट-१ नुसार) पिण्याचे पाणी, चहापान, अल्पोपहार व भोजन इत्यादीचा दर नमूद करण्यात यावा.**

**३.** प्रस्तुत खाद्यपदार्थ पुरवठ्याच्या कराराचा कालावधी एक वर्षाचा राहील. संस्थेच्या कामाची गुणवत्ता पाहून, आवश्यकता वाटल्यास, आयोग व संस्था दोघांच्याही मान्यतेने कराराचा कालावधी अतिरिक्त ६ महिने वाढविता येईल. याबाबतचा अंतिम निर्णय मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचा राहील.

**४.** खाद्यपदार्थ पुरवठ्याच्याचा दर हा सर्व करांसहित नमूद असावा. सदरचा दर कराराच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही .

**५.** अंतिम दिनांक व वेळेनंतरच्या तांत्रिक व आर्थिक दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

**६.** मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना कोणत्याही कारणाशिवाय दरपत्रके स्वीकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार राहतील.

**७.** ज्या संस्थांना महाराष्ट्र शासनाने गैरव्यवहार या कारणांसाठी अपात्र ठरविले आहे, अशा संस्थांना दरपत्रके भरता येणार नाहीत.

**८.** दरपत्रके भरणा-या संस्थांना आपल्या संस्थेचे नाव, पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक देणे आवश्यक राहील. दरपत्रक स्वीकारल्यानंतर रुपये १०,०००/- ची बँक गॅरेंटी डिपॉझिट म्हणून देणे आवश्यक राहील.

**९.** ज्या संस्थेने सर्वात कमी दर नोंदविला असेल, अशा संस्थेचे दरपत्रक स्वीकारण्यात येईल.

**१०.** काल्पनिक, संदिग्ध व सशर्त दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

**११.** ज्या संस्थेचे दरपत्रक स्वीकारले जाईल, त्या संस्थेस काम देण्यापूर्वी त्या संस्थेने **१००/-** च्या स्टँप पेपरवर करार पत्र करणे आवश्यक राहील.

**१२.** यशस्वी निविदाधारकांनी अल्पोपाहार, चहापान, भोजन तयार करताना रंग, मसाले, खाद्यतेले व इतर साहित्य मान्यताप्राप्त व ISI प्रमाणित दर्जाचेच वापरणे अनिवार्य आहे. अल्पोपाहार, चहापान, भोजनानंतर कोणासही अन्न/चहापान बाधल्यामुळे काहीही त्रास झाल्यास त्यामुळे होणाऱ्या जिवीत /आर्थिक / व्यावसायिक हानीस संबंधित पुरवठादार हेच जबाबदार राहतील तसेच संबंधित बाधित व्यक्तिना द्यावयाची सर्व प्रकारची भरपाई ही पुरवठादारांनीच देणे बंधनकारक राहील. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुबई याबाबत कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

**१३.** भोजनाबद्दल, चहापानाबद्दल तसेच अल्पोहाराच्या दर्जाबद्दल कोणत्याही प्रकारची तक्रार राहणार नाही, याची दक्षता संबंधित पुरवठादाराने घेने आवश्यक राहिल.

ठिकाण : मुंबई

दिनांक : १३ मे, २०२२

सचिव,

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**परिशिष्ट-१**

दरपत्रक सादर करण्याकरिता प्रपत्र (दरपत्रक धारकाच्या लेटरहेडवर)

प्रति, दिनांक :

सचिव,

महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

महानगर टेलिफोन निगम लिमिटेड इमारत,

८ वा मजला,महर्षी कर्वे मार्ग,कुपरेज

मुंबई ४०००२१.

कामाचे नाव : पिण्याचे पाणी, चहापान, अल्पोपहार व भोजन इत्यादीचा पुरवठा करण्याबाबत.

दरपत्रक क्रमांक:- /२०२२

महोदय,

मी/ आम्ही उपरोक्त नमुद केलेले काम, दरपत्रक सूचना मधील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून तसेच दरपत्रक सूचनांमध्ये नमुद विनिर्दीष्ट कामाकरिता अदा करावयाच्या देय रकमेचा विचार करून खाली दर्शविलेल्या दरानुसार खरेदी कार्यान्वित करण्यासाठी प्रस्तावित करीत आहोत:-

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| १ | पाणी बॉटल (५०० ML व १००० ML) | |
| २ | चहा/कॉफी | |
| ३ | अल्पोपहार (पोहा,उपमा, शिरा, मिसळ, साबुदाणा खिचडी, ईडली ,डोसा इ.) | |
| ४ | जेवन थाळी (शाकाहारी/मासांहारी) | |

आम्ही दरपत्रक सूचनेतील अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे नियम व कायदे वाचले असुन ते आमच्यावर बंधनकारक आहेत.

आपला विश्वासु,

दरपत्रक धारकाची सही

दिनांक : / /२०२२

नाव:-

पत्ता:-

साक्षीदार:-